Reg. No. 20279 / 2-1-53 RBI. Lic. No.: UBD. MH691P / 1-12-86

# जत अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि; जत

मंगळवार पेठ, जत, जि. सांगली.

ऑडीट वर्ग 'अ'



७४ वा

## वार्षिक अहवाल

सन - २०२५-२०२६

# संस्थापक



**कै. रामभाऊ बोर्गीकर**
पुण्याई



**कै. मल्लाप्पा आडव्याप्पा बिज्जरगी**
संस्थापक चेअरमन
सन १९५३-१९७७



**कै. रेवाप्पा नागाप्पा हत्ती**
माजी चेअरमन
सन १९७७-१९८३

माजी व्हा. चेअरमन
सन १९५६-१९७७

# जत अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि; जत

## संचालक मंडळ

सन २०२५-२०२६



**श्री. बाळासाहेब नागाप्पा हुंचाळकर**
चेअरमन



**श्री. राजेंद्र चंद्रशेखर पट्टणशेट्टी**
व्हा. चेअरमन



**श्री. धनाप्पा आण्णाप्पा ऐनापूरे**



**श्री. आखिल विजय काळगी**



**श्री. गुरुपादप्पा धानाप्पा मोदी**



**डॉ.श्री. मनोहर शिवाप्पा मोदी**



**श्री. शिवलिंगाप्पा चन्नाप्पा संख**



**श्री. गुरुबसू मुरगेप्पा हत्ती**

# जत अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि; जत

## संचालक मंडळ

सन २०२५-२०२६



श्रीमती विजया अशोक बिज्जरगी



सौ. सुवर्णा विजय पाटील



श्री. पांडुरंग धोंडिबा कटरे



श्री. प्रज्वल श्रीमंत साळे



श्री. गुरुपादप्पा शंकर आरळी
तज्ञ संचालक



ॲड.श्री. अशोक आप्पाण्णा निटवे
तज्ञ संचालक



श्री. जगदिश सिद्रामय्या हिरेमठ
मुख्य कार्यकारी अधिकारी



श्री. गिरीश बसाप्पा एकुंडे
उप-व्यवस्थापक

# भावपूर्ण श्रध्दांजली !

अहवाल सालात देशातील जे थोर राजकीय नेते,
संशोधक, शास्त्रज्ञ, लेखक, साहित्यिक, कलाकार,
खेळाडू, सहकार व सामाजिक क्षेत्रातील
कार्यकर्ते, नैसर्गिक आपत्तीत मृत्यूमुखी पडलेले विद्यार्थी,
तसेच सिमेवर व नक्षलवादी हल्ल्यात शहीद झालेले
जवान, देशातील विविध अपघातात स्वर्गवासी झालेले
निष्पाप नागरिक व पोलीस अधिकारी तसेच बँकेचे
सभासद, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक व ज्ञात अज्ञात
दिवंगत झाले त्यांच्या पवित्र स्मृतीस
आदरपूर्वक भावपूर्ण श्रध्दांजली..!

त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती मिळावी
हीच परमेश्वर चरणी प्रार्थना

## सुरक्षित बँकिंग व्यवहार करण्यासाठी सूचना

- आपल्या खात्यावर जमा, नांवे होणाऱ्या व्यवहाराची माहिती मोबाईलवर एस.एम.एस. अलर्टद्वारे कळविली जाईल तसेच आपल्या खात्याचे स्टेटमेंट आपल्या e-mail वर पाठविणेसाठी आपण आपला मोबाईल नंबर व e-mail Address आपले खाते ज्या शाखेत आहे त्या शाखेत द्यावा.
- आपले खाते शक्यतो जोड नावानेच उघडा.
- बँकेतून पैसे काढताना पासबुक अवश्य बरोबर आणा. वेळोवेळी आपले पासबुक भरून, खात्यावरील व्यवहारांचा मेळ घ्या.
- आपले पासबुक किंवा चेकबुक गहाळ झाल्यास ताबडतोब बँकेला माहिती द्या.
- आपली ठेव ठेवताना वारस नोंद करा व पुढील अडचणीपासून निश्चिंत रहा.
- कर्जाचे हप्ते व इतर चार्जेस वेळेत भरा व दंडव्याज वाचवा.
- आपला पत्ता बदलला असल्यास त्याची माहिती त्वरीत बँकेस द्या.
- रिझर्व्ह बँकेच्या सूचनांप्रमाणे सर्व खातेदारांची **KYC** पूर्तता असणे अत्त्यावश्यक आहे. तरी खातेदारांनी शाखेच्या अधिकाऱ्यांना भेटून आपली **KYC** पूर्तता पूर्ण असलेची खात्री करून घ्यावी. यापुढे **KYC** पूर्ण असलेखेरीज खात्यावरून पैसे काढू दिले जाणार नाहीत/चेक पास केले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.
- **व्यक्तिगत नविन खाते उघडणेसाठी**

  आवश्यक कागदपत्रे (**KYC** पूर्तता) :-

  १. फोटो- दोन (२) आयडेंटी कार्ड साईज

  २. पत्ता व ओळख पुरावा :- लाईट बिल, फोन बिल, निवडणूक ओळख पत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, आधार कार्ड, सरपंच, आमदार, खासदार, इत्यादी लोकप्रतिनिधी यांचे किंवा तलाठी, तहसिलदार, जिल्हाधिकारी, शासकीय क्लास वन अधिकारी यासारख्या (पब्लीक सर्व्हंटस्) लोकसेवक यांनी दिलेले प्रमाणपत्र, रजिस्टर्ड भाडेकरार प्रत, इत्यादीपैकी एक प्रत.

  ३. पॅन - पॅन कार्ड झेरॉक्स प्रत.

  **वरील झेरॉक्स प्रती प्रमाणित आवश्यक**

  ४. **फर्म/संस्था/कंपनी/ट्रस्ट** : इत्यादींची खाती उघडतेवेळी आवश्यक **KYC** माहितीसाठी बँकेचे अधिकारी / शाखाधिकारी यांना भेटावे.

## विद्यमान संचालक मंडळ
## सन २०२५-२०२६

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बाळासाहेब नागाप्पा हुंचाळकर | चेअरमन |
| २) | श्री. राजेंद्र चंद्रशेखर पट्टणशेट्टी | व्हा. चेअमन |
| ३) | श्री. धानाप्पा आण्णाप्पा ऐनापुरे | संचालक |
| ४) | श्री. आखिल विजय काळगी | संचालक |
| ५) | श्री. गुरूपादप्पा धानाप्पा मोदी | संचालक |
| ६) | डॉ. श्री. मनोहर शिवाप्पा मोदी | संचालक |
| ७) | श्री. शिवलिंगाप्पा चन्नाप्पा संख | संचालक |
| ८) | श्री. गुरूबसू मुरगेप्पा हत्ती | संचालक |
| ९) | श्रीमती. विजया अशोक बिज्जरगी | संचालिका |
| १०) | सौ. सुवर्णा विजय पाटील | संचालिका |
| ११) | श्री. पांडुरंग धोंडीबा कटरे | संचालक |
| १२) | श्री. प्रज्वल श्रीमंत साळे | संचालक |
| १३) | श्री. गुरूपादप्पा शंकर आरळी | तज्ञ संचालक |
| १४) | ॲड. श्री. अशोक आप्पाण्णा निटवे | तज्ञ संचालक |

मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री. जगदिश सिद्रामय्या हिरेमठ** (B.A., GDC & A, H.D.C.M.)

लेखापरिक्षक

**मे. किशोर आर. जोशी ॲन्ड असोसिएट्स**

चार्टर्ड अकौंटंट, सांगली

कनकरंट ऑडीटर

**मे. आवजी गोब्बी ॲन्ड असोसिएट्स**

चार्टर्ड अकौंटंट, जत.

### - बँकर्स -

महाराष्ट्र राज्य सह. बँक लि; मुंबई.
सांगली जि. म. सह. बँक लि; जत, सांगली, उमदी व संख
बँक ऑफ इंडिया, जत व उमदी.
आय. सी. आ. सी. आय. बँक; जत.
बँक ऑफ बडोदा शाखा जत.
स्टेट बँक ऑफ इंडिया, जत व सांगली.
बँक ऑफ महाराष्ट्र, जत व संख.
एच. डी. एफ. सी. बँक, जत.
आय. डी. बी. आय. बँक, सांगली.
येस बँक लि; कोल्हापूर.

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

## ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(आर्थिक वर्ष दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२६)**

**फक्त सभासदांकरिता**

जत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जत. ता. जत या बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की आपल्या बँकेची सन २०२५-२६ ची ७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३०/०८/२०२६ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता **श्री साई प्रकाश मंगल कार्यालय, विद्यानगर-जत** येथे बँकेचे चेअरमन **मा. श्री. बाळासाहेब नागाप्पा हुंचाळकर** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे, अशी नम्र विनंती आहे.

### सभेपुढील विषय

१) दिनांक ३१/०८/२०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) सन २०२५-२०२६ चे वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून त्यांच्या तपासणी अहवालाची नोंद घेणे. तसेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा सहकार खात्याकडे पाठविलेला दोष दुरूस्ती अहवाल स्विकारणे.
४) सन २०२५-२०२६ या आर्थिक सालात बँकेस झालेल्या निव्वळ नफ्याची विभागणी मा. संचालक मंडळाने सुचविलेली नफा वाटणी मंजूर करणे.
५) सन २०२५-२०२६ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६-२०२७ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे सन २०२६-२०२७ साला करिता वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे पाठविला असल्याची नोंद घेवून त्यास मान्यता देणे व या संदर्भात मा. संचालक मंडळास आवश्यक अधिकार प्रदान करणे.
७) सन २०२७-२०२८ साठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) अहवाल सालात महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार कर्ज परतफेड योजनेनुसार ज्या कर्जदारांना एकरकमी कर्ज परतफेड योजनेची सवलत दिली आहे, या बाबतचा आढावा घेणे.
९) बँकेचे संचालक व त्यांचे नातेतवाईक यांच्याकडील कर्जाची नोंद घेणे.
१०) उमदी व संख शाखेसाठी जागा / इमारत यासाठी गुंतवणूक करणे.
११) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या बँकेच्या काही पोटनियम (Byelaws) दुरुस्तीस मान्यता देणे (सोबत पोटनियम दुरुस्तीचा मसुदा जोडला आहे.)
१२) मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**श्री. जगदिश सिद्रामय्या हिरेमठ**
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : जत
दिनांक : १३/०८/२०२६

**सभासदांना नम्र सूचना :-**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी ३.३० वा. भरेल त्यास गणसंख्या पुर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) बँकेच्या सभासदांना सभेच्यावेळी काही प्रश्न विचारावयाचे असलेस त्यांनी ते दि. २५/०८/२०२६ पूर्वी बँकेच्या वेळेत मुख्य कार्यालयाकडे लेखी सादर करावेत.
३) कायद्यातील तरतुदीप्रमाणे सर्व सभासदांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर सभेपुर्वी त्याच ठिकाणी दुपारी ठीक २.०० वा. सभासद प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. तरी आपण सदर प्रशिक्षणास वेळेत उपस्थित रहावे अशी विनंती आहे.
४) सन २०२५-२०२६ सालाचे नफातोटा पत्रक व ताळेबंदपत्रक इ. बँकेच्या ऑफिसमध्ये सभासदांना पाहणेसाठी ठेवलेले आहे तसेच बँकेची वेबसाईट **www.jathurban.bank.in** यावरही उपलब्ध आहे.

# ७४ वा वार्षिक अहवाल

सन २०२५-२०२६

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,

सस्नेह नमस्कार,

आपल्या बँकेच्या दि. ३१/३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने केलेल्या उल्लेखनिय कामगिरीचा आढावा घेताना तसेच गेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला लेखा परिक्षण अहवाल, सन २०२६-२७ चे खर्चाचे अंदाजपत्रक सादर करताना मला आनंद होत आहे.

तसेच सन २०२५-२०२६ या सालामध्ये बँकेच्या एकूण ठेवी रु. १०६३३.५२ लाख झाल्या असून, बँकेने १०० कोटी ठेवींचा टप्पा पार केला असून रिझर्व्ह बँकेच्या निकषा प्रमाणे आपल्या बँकेचे **Tier-I** मधुन **Tier-II** मध्ये स्थित्यंतर झालेले आहे. हि बाब बँकेस गौरवास्पद आहे.

अहवाल सालामध्ये बँकेने दरवर्षीप्रमाणे प्रगतीची वाटचाल सुरु ठेवली असून ही बाब तुलनात्मक आकडेवारीवरुन लक्षात येईल.

(आकडे रु. लाखात)

| अ.नं. | तपशील | सन २०२३-२०२४ | सन २०२४-२०२५ | सन २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|
| १ | भाग भांडवल | ३१०.७६ | ३४३.५५ | ३८०.२७ |
| २ | राखीव व इतर निधी | १२४९.४९ | १३६६.३८ | १४८३.९२ |
| ३ | ठेवी | ७५९४.४२ | ८८६४.३४ | १०६३३.५२ |
| ४ | कर्जे | ५४३८.६० | ६५८१.८५ | ७८१३.६५ |
| ५ | गुंतवणूक | ३२२८.०० | ३५०९.६३ | ४११३.४९ |
| ६ | खेळते भांडवल | ९२९३.५१ | १०७३२.८४ | १२६९१.६७ |
| ७ | थकबाकी प्रमाण | ४.२०% | ३.९७% | २.११% |
| ८ | एकूण उत्पन्न | ७५४.१० | ८९७.९४ | १०६७.१९ |
| ९ | निव्वळ नफा | ९५.७० | १३१.०९ | १३५.३३ |
| १० | ऑडीट वर्ग | ''अ'' | ''अ'' | ''अ'' |
| ११ | सभासद ''अ'' वर्ग | २८४१ | २९८२ | २९८६ |
| १२ | सभासद ''ब'' वर्ग | ६२७ | ६०६ | ६२८ |

या वरुन असे दिसून येते की, बँकेने सर्वच स्तरावर चांगली प्रगती साधली आहे. बँकेने आपली विश्वासार्हता टिकविली आहे. व्याजदरापेक्षा आपण गुंतविलेले पैसे सुरक्षित आहेत का ही बाब ग्राहकांना जास्त महत्वाची वाटते. बँकेने नियोजनबध्द वाटचाल करुन पारदर्शक कारभार व दूरदृष्टीने घेतलेले अचूक निर्णय यामुळे ही विश्वासार्हता वाढलेली आहे. अहवाल सालअखेर बँकेच्या ठेवीचे रु. १०६,३३.५२ लाख व कर्जाचे रु. ७८१३.६५ लाख असे एकत्रित व्यवसायाचे रु. १८४,४७.१७ लाखाचे उद्दिष्ट पार केले आहे. हे आपणासमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार नागरी सहकारी बँकांना भांडवल पर्याप्तता प्रमाण (सी.आर.ए.आर.) किमान १२% असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचे ते प्रमाण १८.३२% इतके आहे. बँकेने याबाबतच्या रिझर्व्ह बँकेच्या नियमांची पुर्तता केली आहे. यावरुनच आपल्या बँकेची सक्षमता दिसून येते.

### सभासद भाग भांडवल व निधी -

मागील अहवाल वर्ष अखेरीस एकूण सभासद संख्या २९८२ इतकी होती. या अहवाल वर्षात नवीन झालेला सभासदांची संख्या ६८ असून सभासद (राजीनामा व मयत इ.) ६४ ने कमी होऊन वर्ष अखेरीस एकूण सभासद संख्या २९८६ इतकी राहीली आहे. अहवाल सालात बँकेचे भाग भांडवल रु. २६.७२ लाख ने वाढले असून दि. ३१/३/२०२६ अखेरीस एकूण वसूल भाग भांडवल रु. ३८०.२७ लाख इतके आहे. मागील वर्षी एकूण निधी रु. १३६६.३८ लाख इतका होता त्यात रु. ११७.५४ लाख ने वाढ होऊन वर्षाच्या अखेरीस रु. १४८३.९२ लाख इतका निधी झालेला आहे.

### क्रियाशिल सभासद -

आपल्या बँकेने ९७ व्या घटना दुरुस्तीस अनुसरुन महाराष्ट्र शासनाने लागू केलेले आदर्श पोट नियम स्विकारले आहेत. आदर्श पोटनियमामध्ये क्रियाशिल व अक्रियाशिल सभासद वर्गीकरण केले आहे. दि. ३१/३/२०२६ अखेर आपल्या बँकेच्या एकूण ठेवी रु. १०६,३३.५२ लाख झालेले असलेने.

क्रियाशिल सभासदांसाठी अ) सभासदांनी किमान रु. १०००/– चे भाग भांडवल धारण केले असले पाहिजे ब) सभासदांचे ठेव रु. ५०००/– किंवा ५००००/– चे कर्ज (ठेव तारण सोडून) घेतले असले पाहिजे.

तरी सभासदांना विनंती की बँकेच्या पोटनियम क्र. १५ प्रमाणे क्रियाशिल सभासदांसाठी आवश्यक असणाऱ्या अटींची पूर्तता करावी.

### ठेवी -

बँकेच्या ठेवीमध्यील वाढ हे ठेवीदारांच्या बँकेवरील असणाऱ्या विश्वासाचे प्रतिक होय. बँकेची प्रगती प्रामुख्याने ठेव वाढीवर अवलंबुन असते आपल्या बँकेचा पारदर्शी कारभार व बँकेच्या ग्राहकांचा असणारा दृढ विश्वास, उत्तम सेवा यामुळे आपल्या बँकेच्या ठेवीमध्ये भरीव वाढ झालेली आहे. याबद्दल सर्व ठेवीदारांचे बँकेच्या वतीने मी ऋण व्यक्त करतो. तसेच आपण सर्व सभासदांनी आपले व्यवहार आपल्याच बँकेमार्फत करावे असे मी आवाहन करतो.

सध्या बँकींग क्षेत्रात अमुलाग्रह बदल होत आहेत. बँकामधील स्पर्धा, राष्ट्रीय स्तरावरील आर्थिक घडामोडी या सर्व बाबींचा विचार करता बँकेच्या दि. ३१/३/२०२६ अखेर सर्वप्रकारच्या ठेवी रु. १०६३३.५२ लाख इतक्या आहेत. चालू वर्षी बँकेच्या ठेवीमध्ये रु. १७६९.०६ लाख इतकी वाढ झालेली आहे. अहवाल सालात ठेववाढीचे प्रमाण १९.९६% इतके आहे.

### ठेव विमा -

आपल्या बँकेतील ग्राहकांच्या ठेवीच्या सुरक्षीततेसाठी डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन लि; मुंबई यांचेकडे ठेवीचा विमा उतरविण्यात आलेला असून बँकेने अहवाल सालामध्ये ठेव विमा हप्त्याची रक्कम खालील प्रमाणे भरली आहे.

दि. ०४/०२/२०२१ पासून रुपये ५ लाख पर्यंतच्या ठेवींना (एकत्रीत) विमा संरक्षण आहे.

| अ.नं. | ठेव विमा कालावधी | विमाहप्त्याची रक्कम GST सह |
|---|---|---|
| १ | सप्टेंबर २०२५ अखेरचा हप्ता | ६,२८,०५२.०० |
| २ | मार्च २०२६ अखेरचा हप्ता | ६,५९,०४६.२८ |
| ३ | सप्टेंबर २०२६ अखेरचा हप्ता | ६,२७,३७७.८५ |

**कर्जे -**

बँकींग व्यवसायात कर्ज व्यवहार हा मुलभूत घटक आहे. बँकेने कर्ज व्यवहारात केलेली गुंतवणूक ही बँकांची नफा क्षमता निश्चित करु शकते. तसेच रिझर्व्ह बँकेचे एन.पी.ए. बाबतचे अधिक कडक धोरण तसेच सद्या बँकींग व्यवसायात खाजगी फायनान्स कंपन्या, खाजगी व परदेशी बँका येऊ लागल्याने नागरी सहकारी बँकांना त्यांचेशी करावी लागणारी स्पर्धा या सर्व गोष्टीमुळे अधिक जबाबदारीने व सावधपणे कर्ज पुरवठा करण्याचे धोरण आपल्या बँकेने स्विकारलेले आहे.

बँकेने दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर सभासदांना कर्ज पुरवठा करुन त्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लावला आहे. मागील वर्षी एकूण कर्जे रु. ६५८१.८५ लाख इतकी होती त्या मध्ये रु. १२३१.८० लाख इतकी वाढ होऊन दि. ३१/३/२०२६ अखेर एकूण कर्ज येणे बाकी रु. ७८१३.६५ लाख एवढी आहे. अहवाल सालात कर्ज वाढीचे प्रमाण १८.७२% इतके आहे. आपल्या बँकेच्या कर्जाचे ठेवीशी प्रमाण (सी.डी. रेशो) ७३.४८% इतके आहे.

**अग्रक्रम व दुर्बल घटक कर्ज पुरवठा -**

बँकेने केलेले कर्ज वाटप हे रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार केले असून दि. ३१/३/२०२६ अखेर अग्रक्रम क्षेत्रासाठी ७२.५०% व दुर्बल घटक क्षेत्रासाठी १२.४९% इतका कर्ज पुरवठा केला आहे.

**गुंतवणूक -**

दि. ३१/३/२०२५ अखेर एकूण गुंतवणूक रु. ३५०९.६३ लाख इतकी होती. त्यामध्ये चालू सालात रु. ६०३.८६ लाख इतकी वाढ होऊन दि. ३१/३/२०२६ अखेर एकूण गुंतवणूक रु. ४११३.४९ लाख इतकी झालेली आहे.

**संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे -**

दि. ३१/३/२०२६ अखेर संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे नाहीत.

**पोटनियम दुरुस्ती / Bye-Law Amendments (विषय क्र. ११) पाटीनयम दुरुस्ती मसुदा पान क्र. २४ ते ३५**

१) बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,००,०००/- (अक्षरी रु. पाच कोटी मात्र) असुन ती रु. ८,००,००,०००/- (अक्षरी रु. आठ कोटी मात्र) पर्यंत वाढविणे.

२) किमान भाग रु. १,०००/- करणे.

३) बँकेचे चेअरमन हे संचालक मंडळ फक्त संचालक मंडळ सभा व कार्यकारी समिती सभा या दोन सभेचे चेअरमन राहतील.

४) बँकेच्या ठेवी रु. १०० कोटीच्या वर गेलेने Board of Management ची रचना करणे.

वरील चार विषयाबाबत पोटनियमामध्ये वेगवेगळ्या दुरुस्त्या संचालक मंडळाने सुचविलेले आहेत. त्यास मंजूरी मिळावी.

**थकबाकी -**

दि. ३१/३/२०२५ रोजी थकबाकी रु. २६१.३८ लाख इतकी होती त्याचे शेकडा प्रमाण ३.९७% इतके होते. अहवाल साल अखेर दि. ३१/३/२०२६ रोजी थकबाकी रु. १६४.६५ लाख इतकी असून या थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण २.११% इतके आहे. अहवाल साल अखेर थकबाकी वसुलीकामी मा. संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे कारवाई केली आहे.

| अ.नं. | तपशील | कर्ज प्रकरणे संख्या | मुद्दल रक्कम रु. | व्याज रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | बँकेने विशेष वसुली अधिकारी यांचेकडे वसुलीसाठी दिलेली प्रकरणे | ७ | ७२,५९,०६६.०० | ४९,१४,३३४.०० |
| २ | बँकेने कोर्टामध्ये लवाद दावे १०१ खालील दाखल केलेली प्रकरणे | १ | ५,४८,६१९.०० | १,४६,६०२.०० |
| ३ | बँकेने कोर्टामध्ये लवाद दावे ९१ खालील दाखल केलेली प्रकरणे | १ | १८,६२,०९०.०० | १८,०३,८७४.०० |
| ४ | बँकेने वसुली साठी नोटीसा पाठविलेली प्रकरणे | १७ | ८९,४४,९७१.०० | ८,४९,५०९.०० |
| | एकूण - | २६ | १,८६,१४,७४६.०० | ७७,१४,३१९.०० |

## थकबाकी कालनिहाय वर्गीकरण

| अ.नं. | कालावधी वर्षे | संख्या | रक्कम रु. ३१ मार्च २०२६ |
|---|---|---|---|
| १ | १ वर्षा पर्यंत | ४० | २३,८८,४२५.०० |
| २ | १ वर्ष ते ३ वर्षा पर्यंत | ४ | २,५८,५२९.०० |
| ३ | ३ वर्ष ते ५ वर्षा पर्यंत | ६ | ७६,५७,३२८.०० |
| ४ | ५ वर्षा पुढील | ५ | ६१,६०,६३२.०० |
| | एकूण - | ५५ | १,६४,६४,९१४.०० |

कर्जदार सभासदांचेवर थकबाकी वसुलीचा प्रसंग भविष्यात येऊ नये म्हणून सभासदांनी आपले कर्ज मुदतीत भरून बँकेचे हितास प्राधान्य द्यावे तसेच बँकेशी असलेले आपले संबंध चांगले राहतील याची काळजी घ्यावी. असे मी आपणास आवाहन करतो अहवाल सालात थकबाकी वसुलीसाठी विशेष प्रयत्न करणारे बँकेचे मा. संचालक, हितचिंतक, मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष वसुली अधिकारी, शाखाधिकारी, सर्व सेवक व विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी इ. मदत करणाऱ्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

### उत्पन्नक्षम नसलेली कर्जे (एन.पी.ए.) -

दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर बँकेचे एकूण येणे कर्ज रु. ७८१३.६५ लाख आहे. त्यापैकी एकूण ढोबळ एन.पी.ए. कर्ज रक्कम रु. १८७.१५ लाख इतकी आहे. येणे कर्जाशी ढोबळ एन.पी.ए. चे शेकडा प्रमाण २.३८% इतके आहे. निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.००% इतके आहे. तरी एन.पी.ए. खातेदारांनी कर्ज भरून बँकेस सहकार्य करावे अशी मी विनंती करीत आहे.

### कोअर बँकींग प्रणाली -

रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार आपल्या बँकेने कोअर बँकींग प्रणाली अद्ययावत केलेली आहे. सदर प्रणालीचा बँकेच्या ग्राहकांना चांगला उपयोग होत आहे. तसेच बँकेने एच.डी.एफ.सी. बँकेतर्फे आय.एफ.एस.सी. (I.F.S.C.) कोड क्रमांक (HDFC0CJATHB) हा मिळविलेला आहे. त्याचाही फायदा बँकेच्या सर्व ग्राहकांना होत असून बँकेकडून आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. व्दारे तात्काळ रक्कम ट्रान्सफरची सेवा पुरविली जात आहे. तसेच बँकेच्या सभासद, कर्जदार व ठेवीदार खातेदार यांना मोबाईल एस.एम.एस. अलर्टची सेवा व बिझनेस QR ने पैसे जमा करणेची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

## नफा वाटणी -

बँकेस अहवालसालात रु. २७९.२६ लाख इतका ढोबळ नफा झालेला आहे. सदर ढोबळ नफ्यातून रु. ७८.७४ लाख आयकर व इतर तरतुद रु. ५९.१९ लाख इतकी वजा करुन अहवाल साली बँकेला निव्वळ नफा रु. १,३५,३३,३६३.२२ इतका झालेला आहे. सदर नफ्यातुन आर.बी.आय.च्या परिपत्रका प्रमाणे व बँकेचे उपविधिप्रमाणे नफ्याची विभागणी मा. संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे केलेली आहे. त्यास कार्योत्तर मंजूरी द्यावी अशी नम्र विनंती.

**निव्वळ नफा सन २०२५-२०२६**

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| | **निव्वाळ सन २०२५-२०२६** | १,३५,३३,३६३.२२ |
| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
| १ | राखीव निधी | ३३,८८,३६३.२२ |
| २ | सभासदांना लाभांश (१०%) प्रमाणे तरतुद | ३५,८५,०००.०० |
| ३ | सभासद कल्याण निधी | ५,००,०००.०० |
| ४ | सभासद शिक्षण निधी | ५,१०,०००.०० |
| ५ | अमृत महोत्सव निधी | ७,००,०००.०० |
| ६ | गुंतवणूक चढ उतार निधी | १५,००,०००.०० |
| ७ | टेक्नॉलॉजिकल डेव्ह. फंड | ८,००,०००.०० |
| ८ | विकास निधी | १,००,०००.०० |
| ९ | इमारत निधी | २४,५०,०००.०० |
| | एकूण रुपये - | १,३५,३३,३६३.२२ |

## लेखापरिक्षण व हिशोब तपासणी -

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मे. किशोर आर. जोशी ॲन्ड असोसिएटस् सनदी लेखा परिक्षक सांगली यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करुन ऑडीट वर्ग ''अ'' दिला आहे. बँकेच्या कामकाजासंदर्भात त्यांनी केलेल्या मौलिक सुचना व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

तसेच मे. आवजी गोब्बी ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, जत यांनी अहवाल वर्षाचे जत, सांगली, उमदी व संख शाखेचे कंकरंट ऑडीट पूर्ण केले असून दि. ३१/३/२०२६ अखेरच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी तपासणी दरम्यान शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केलेल्या मौलिक सुचना व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत.

## सभा -

अहवाल सालामध्ये दि. ३१/८/२०२५ रोजी आपल्या बँकेची ७६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन त्यामध्ये सन २०२४-२०२५ सालाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके मंजूरी इ. कामकाज नियमाप्रमाणे करणेत आले. तसेच अहवाल सालामध्ये संचालक मंडळाच्या २७ सभा घेणेत येऊन त्यामध्ये बँकेचे दैनंदिन कामकाजासंबंधीचे निर्णय घेणेत आले. सर्व संचालकांनी बँकेच्या कामकाजात आस्थेवाईकपणे लक्ष घालून वेळोवेळी बँकेच्या प्रगतीस पोषक असे निर्णय घेतले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

## शाखा कामकाज -

रिझर्व्ह बँकेकडून आपल्या बँकेला उमदी व संख, ता. जत, जि. सांगली याठिकाणी दोन नविन शाखा उघडणेस लायसेन्स प्रधान करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आपल्या बँकेने दि. ५/१२/२०२५ रोजी उमदी येथे व दि. ५/१/२०२६ रोजी संख येथे शाखा सुरु केलेले आहेत. आपल्या बँकेच्या दिनांक ३१/३/२०२६ अखेर शाखावार ठेवी, कर्जे व नफा-तोटा खालील प्रमाणे.

(आकडे रु. लाखात)

| अ.नं. | शाखा | ठेवी | कर्जे | नफा |
|---|---|---|---|---|
| १ | जत | ९४६९.५० | ६८३१.८३ | १४०.८७ |
| २ | सांगली | ११२१.२६ | ७८४.१६ | ३.०९ |
| ३ | उमदी | १७.१३ | ११९.९२ | - ५.०० |
| ४ | संख | २५.६३ | ७७.७४ | - ३.६३ |
| | एकूण - | १०६,३३.५२ | ७८१३.६५ | १३५.३३ |

## सभासद व खातेदारांना सूचना -

रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. DBOD.No.DEAF Cell. BC. 114/30.01.002/2013-14 dt. 27/05/2014 नुसार बँकेकडील १० वर्षे व त्यावरील कालावधीमध्ये व्यवहार न झालेल्या ठेवी व इतर जमा रक्कमा रिझर्व्ह बँकेकडील Deposit Education & Awarness Fund (DEAF) खातेस वर्ग करण्याची सूचना केली आहे. सभासदांनी के. वाय. सी. निकषांची पूर्तता करून ठेव खात्यावर व्यवहार / नुतणीकरन करावे किंवा जमा रक्कम घेऊन जावे. अन्यथा रक्कमा रिझर्व्ह बँकेकडे वरीलप्रमाणे वर्ग करण्यात येतील.

## नोकर वर्ग -

अहवालसालात कर्मचाऱ्यांची एकूण संख्या २४ आहे. अल्पबचत एजंट म्हणून ३ एजंट काम पहातात. आपल्या बँकेच्या सेवक वर्गाने अत्यंत विनम्र व तत्परतेने ग्राहकांची सेवा करून सभासद व ग्राहकांशी आपुलकी व जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केलेले आहेत. सर्व सेवकांनी यापुढे बँकींग व्यवसायातील तीव्र स्पर्धा, बदलणारी बँकींग व्यवसाय प्रणाली व इतर नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यास यापुढेही सिध्द रहावे व आपल्या बँकेचे नांव उज्वल करावे असे मी त्यांना आवाहन करतो.

## आभार -

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे मा. जिल्हा उपनिबंधक सह. संस्था, सांगली मा. विशेष लेखा परिक्षक सह. संस्था सांगली, मा. सहाय्यक निबंधक सह. संस्था जत यांचे वेळोवेळी बँकेला सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. लेखा परिक्षक व कंकरंट ऑडीटर यांनी वेळोवेळी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. बँकेच्या प्रगतीमध्ये माझे सहकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप-व्यवस्थापक, शाखाधिकारी, इतर कर्मचारी, सभासद, ठेवीदार, कर्जदार, कायदा सल्लागार, सराफ व्हॅल्युएटर, इंजिनिअर व हितचिंतक यांनी जे आपुलकीने सहकार्य दिले त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

मा. संचालक मंडळाच्या वतीने सादर केलेला हा ७४ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, हिशोब पत्रकास आपण मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

धन्यवाद...

**।। जय हिंद ।। जय महाराष्ट्र ।। जय सहकार ।।**

आपला नम्र,

**श्री. बाळासाहेब नागाप्पा हुंचाळकर**

चेअरमन

## तक्ता क्रमांक १

कर्ज येणेबाकी रु. ७८१३.६५ लाख रकमेची वर्गवारी खाली दिलेली आहे.

कर्ज येणेबाकी रकमेनुसार वर्गवारी तपशील

| अ.नं. | तपशील | कर्जदार संख्या | येणे बाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | रुपये १०,०००/- पर्यंत | १२ | ३०,५२२.५० |
| २ | रुपये १०,००१/- ते रुपये २५,०००/- पर्यंत | ४७ | ८,५७,४६१.०० |
| ३ | रुपये २५,००१/- ते रुपये ५०,०००/- पर्यंत | १८७ | ६९,३०,२१६.०० |
| ४ | रुपये ५०,००१/- ते रुपये १,००,०००/- पर्यंत | ३०५ | २,२१,११,९६०.०० |
| ५ | रुपये १,००,००१/- ते रुपये ५,००,०००/- पर्यंत | ५३७ | ११,८७,५०,७६६.२९ |
| ६ | रुपये ५,००,०००/- वरील | ३३१ | ६३,२६,८३,८७४.४४ |
| | एकूण - | १४१८ | ७८,१३,६४,८००.२३ |

## तक्ता क्रमांक २

कर्जवाटप उद्देशानुसार वर्गवारी तपशील

| अ.नं. | तपशील | कर्जदार संख्या | येणे बाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|
| | प्रायॉरिटी सेक्टर | | |
| १ | व्यापार (रिटेल) | १२१ | १५,३७,४७,८१७.३५ |
| २ | घर बांधणी / घर दुरुस्ती | ३३ | ३,९४,१५,३१६.०० |
| ३ | शेतीपुरक व्यवसाय | २२४ | ३,०८,८९,३२९.०० |
| ४ | लहान वहातुकदार | ४७ | ३,७७,८४,९९१.०० |
| ५ | स्वयंरोजगार | १७९ | २५,९७,४०,९८२.५० |
| ६ | शिक्षण | ६ | १४,८८,९२७.०० |
| ७ | इतर प्रायॉरिटी | ९२ | ४,३४,३६,४३५.०० |
| | एकूण - | ७०२ | ५६,६५,०३,७९७.८५ |
| | इतर नॉन प्रायॉरिटी | ७१६ | २१,४८,६१,००२.३८ |
| | एकूण - | १४१८ | ७८,१३,६४,८००.२३ |

## तक्ता क्रमांक ३

### हातातील शिल्लक व बँकातून चालू खात्यातील शिल्लक (Cash in Hand & Balance with Banks)

| तपशील | दि. ३१/३/२०२५ रुपये | पैसे | दि. ३१/३/२०२६ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|
| **रोख शिल्लक** | **४९,६१,८३५.००** | | **५८,९०,०७४.००** | |
| **करंट खाती** | | | | |
| सांगली जि. म. सह. बँक शाखा, जत | १,०५,१५,१५०.९२ | | ७४,०३,११८.२७ | |
| सांगली जि. म. सह. बँक शाखा, सांगली | २७,९०,४२७.३४ | | ९,००,७०३.१७ | |
| सांगली जि. म. सह. बँक शाखा, उमदी | – | | ३,०४,९५०.०० | |
| सांगली जि. म. सह. बँक शाखा, संख | – | | ४,९७०.०० | |
| एम. एस. सी. बँक लि; मुंबई | ९,५१,१६३.५२ | | ४,०४,०६३.४७ | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, जत | २८,४१,१५६.८९ | | ८,४७,७८१.६९ | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, सांगली | ९८,२१९.२० | | १,९७,५४६.६० | |
| बँक ऑफ इंडिया शाखा, जत | ४५,९२,५१६.३९ | | २३,६६,६८३.३९ | |
| बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, जत | १६,१५,४२५.५८ | | ८४,७३,२२१.५८ | |
| बँक ऑफ महाराष्ट्र (स्टाफ ग्रॅज्युईटी खाते) | २,३७,५९६.९९ | | ३,४२,५४५.४५ | |
| बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, संख | – | | ५३,८७७.२४ | |
| बँक ऑफ बडोदा शाखा, जत | १,५१,४६,२७६.८२ | | १,७९,००,३०५.८२ | |
| **इतर बँकातील शिल्लक** | | | | |
| आय.डी.बी.आय. बँक लि; शाखा, सांगली | ९,८३,७०१.२९ | | १६,८२,४८८.२६ | |
| आय. सी. आय. सी. बँक शाखा, जत | १९,४२,६३२.०० | | ८८,९८,९९८.०० | |
| एच. डी. एफ. सी. बँक, जत | ७०,८७,८०८.०६ | | ७४,८६,७६६.७१ | |
| येस बँक लि; जत | ४,१२५.०८ | | ४,१२५.०८ | |

## तक्ता क्रमांक ४

### येणे व्याज (Interest Receivable)

| तपशील | दि. ३१/३/२०२५ रुपये | पैसे | दि. ३१/३/२०२६ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|
| कर्जावरील येणे व्याज | १,२९,९९,२२७.०० | | ८१,०६,३८४.०० | |
| गुंतवणूकीवरील येणे व्याज | ३,४७,२५०.०० | | ५,५६,३७५.०० | |
| सरकारी रोखे गुंतवणूकीवरील येणे व्याज | ३५,२८,९४७.०० | | ३५,८७,३४४.०० | |
| एकूण | **१,६८,७५,४२४.००** | | **१,२२,५०,१०३.००** | |

## तक्ता क्रमांक ५

### देणे व्याज (Interest Payable)

| तपशील | दि. ३१/३/२०२५ रुपये | पैसे | दि. ३१/३/२०२६ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|
| ठेवीवरील देणे व्याज | ४,५०,४१४.०० | | ३,६४,६४५.०० | |
| मुदत संपलेल्या ठेवीवरील देणे व्याज | १,३५,०११.०० | | १,३२,३११.०० | |
| एकूण | **५,८५,४२५.००** | | **४,९६,९५६.००** | |

## तक्ता क्रमांक ६

### फर्निचर, फिक्चर्स व संगणक

| तपशील | दि. ३१/३/२०२५ रुपये | पैसे | दि. ३१/३/२०२६ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|
| डेडस्टॉक | ७,९३,४१९.०० | | २५,७३,५५७.०० | |
| कॉम्प्युटर | ६,८६,७०४.०० | | १३,८२,२३४.०० | |
| इलेक्ट्रिक फिक्चर्स अँड फिटींग्ज | १,६०,००४.०० | | २,३३,९१७.०० | |
| **एकूण** | **१६,४०,१२७.००** | | **४१,८९,७०८.००** | |

## तक्ता क्रमांक ७

### आर्थिक प्रमाणके

| अ.नं. | तपशील | दि. ३१/३/२०२५ रुपये | पैसे | दि. ३१/३/२०२६ रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवल पर्याप्तता शेकडा प्रमाणक (सहकारी बँकांना C.R.A.R. लागू असलेल्या निकषाप्रमाणे) | १९.५९% | | १८.३२% | |
| २ | ढोबळ एन.पी.ए. कर्जाचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण | ३.१६% | | २.३८% | |
| ३ | निव्वळ एन.पी.ए. कर्जाचे निव्वळ कर्जाशी शेकडा प्रमाण | ०.००% | | ०.००% | |
| ४ | व्याज उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ८.२७% | | ८.३०% | |
| ५ | इतर उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | ०.०९% | | ०.१२% | |
| ६ | व्यवस्थापकीय खर्चाचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | २.२१% | | २.६२% | |
| ७ | ढोबळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | २.२४% | | २.४२% | |
| ८ | निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी शेकडा प्रमाण | १.२७% | | १.१७% | |
| ९ | मालमत्तेवरील मिळालेल्या उत्पन्नाचा शेकडा दर | १.२५% | | १.१६% | |
| १० | प्रति सेवक व्यवसाय | ९०८.६० | | ७६८.६३ | |
| ११ | प्रति सेवक ढोबळ नफा | १४.१४ | | ११.६४ | |
| १२ | बुडित व संशयित निधी तरतूद | २४५.२५ | | २७५.२५ | |
| १३ | गुंतवणूक घसारा निधी | ६५.०० | | ६५.०० | |
| १४ | गुंतवणूक चढ उतार निधी | ५२.६५ | | ६२.६५ | |
| १५ | बुडित व संशयित निधी (स्टँडर्ड ॲसेट) तरतुद | १९.०० | | ३२.०० | |
| १६ | संचालक, नातेवाईक कर्जे | नाहीत | | नाहीत | |
| १७ | येणे कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण | ३.९७% | | २.११% | |
| १८ | खेळते भांडवल | १०७३२.८४ | | १२६९१.६७ | |

## १० वर्षे वरील अनऑपरेटींग खात्यांची रक्कम RBI कडे वर्ग केलेली माहिती (DEAF)

| अ.नं. | तपशील | रक्कम (लाखात) | रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ३४.८६ | ३९.५९ |
| २ | चालू वर्षी रिझर्व्ह बँकेकडे वर्ग केलेली रक्कम | ५.४० | १०.७१ |
| ३ | **DEAF** कडून क्लेमची परत आलेली रक्कम | ०.६७ | ०.४३ |
| ४ | ३१/०३/२०२६ शिल्लक रक्कम | ३९.५९ | ४९.८७ |

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

## शेड्युल ३ (बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ कलम २९) फॉर्म 'अ'

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | भांडवल व देणी | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| -- | | **१. भांडवल** | - | | -- | |
| ५,००,००,०००.०० | | अ) अधिकृत भागभांडवल | - | | ५,००,००,०००.०० | |
| - | | २०,००,०० भाग प्रत्येकी रु. २५/- चा | - | | - | |
| ३,४३,५४,५२५.०० | | ब) वसुल भागभांडवल (वैयक्तिक) | - | | ३,८०,२७,१७५.०० | |
| -- | | **२. राखीव निधी व इतर निधी** | - | | -- | |
| १३,६६,३७,६१९.१२ | | अ. रिझर्व्ह फंड खाते | ५,५१,७०,९९५.५२ | | १४,८३,९१,६२२.५२ | |
| | | ब. इमारत निधी | २,९३,८७,०००.०० | | | |
| | | क. बुडित कर्ज निधी | २,७५,२५,०००.०० | | | |
| | | ड. धर्मादाय निधी | १,६०,०००.०० | | | |
| | | इ. स्टँडर्ड असेटवरील तरतूद | ३२,००,०००.०० | | | |
| | | फ. सभासद कल्याण निधी | ३३,७९,७००.०० | | | |
| | | ग. अमृत महोत्सव निधी | ४८,५४,८७२.०० | | | |
| | | म. गुंतवणूक घसारा निधी | ६५,००,५७४.०० | | | |
| | | भ. सभासद शिक्षण निधी | २३,०२,८०७.०० | | | |
| | | न. टेक्नॉलॉजीकल डेव्हलपमेंट फंड | ६५,६३,८९१.०० | | | |
| | | ण. निवडणूक निधी | ३,७१,७८३.०० | | | |
| | | त. गुंतवणूक चढ-उतार निधी | ६२,६५,०००.०० | | | |
| | | थ. विकास निधी | ४,००,०००.०० | | | |
| | | द. बुडित कर्ज निधी २०२४ | २३,१०,०००.०० | | | |
| -- | | **३. प्रधान / पूरक राज्य भागीदारी निधी** | - | | -- | |
| ८८,६४,३३,८३८.४५ | | **४. ठेवी व इतर खाते (व्यक्तिशः)** | - | | १०६,३३,५२,३०७.३२ | |
| | | अ. मुदत ठेव | २४,५६,२४,८२८.०० | | | |
| | | ब. संकलित ठेव | ५९,३२,११,०४७.०० | | | |
| | | क. रिकरिंग ठेव | ६४,५६,७४४.१२ | | | |
| | | ड. अल्पबचत ठेव | ६८,०३,२७५.०० | | | |
| | | इ. सेव्हिंग ठेव | १९,५०,८९,७९५.६९ | | | |
| | | फ. करंट ठेव | १,६१,६६,६१७.५१ | | | |
| -- | | **५. घेतलेली कर्जे** | | | -- | |
| १०५,७४,२५,९८२.५७ | | बेरीज पुढील पानावर | | | १२४,९७,७१,१०४.८४ | |

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

**दिनांक : ३१/०३/२०२६ अखेरचा एकत्रित ताळेबंद**

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | मालमत्ता व येणी | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| ४,४७,३३,४६९.९४ | | **१. रोख व बँक शिल्लक** | – | | ४,५०,८९,८४०.६८ | |
| – | | अ) हातातील शिल्लक | ५८,९०,०७४.०० | | – | |
| | | ब) करंट खाती – | | | | |
| | | अ. जि. म. स. बँक सांगली | ८६,१३,७४१.४४ | | | |
| | | ब. एम. एस. सी. बँक लि; मुंबई | ४,०४,०६३.४७ | | | |
| | | क. बँक ऑफ महाराष्ट्र | ८८,६९,६४४.२७ | | | |
| | | ड. स्टेट बँक ऑफ इंडिया | १०,४५,३२८.२९ | | | |
| | | इ. बँक ऑफ इंडिया | २३,६६,६८३.३९ | | | |
| | | फ. बँक ऑफ बरोडा | १,७९,००,३०५.८२ | | | |
| ९०,३४,५६५.१४ | | **२. इतर बँकातील शिल्लक** | – | | १,८०,७२,३७८.०५ | |
| – | | १. करंट खाती | – | | – | |
| | | अ. आय. सी. आय. सी. बँक लि; | ८८,९८,९९८.०० | | | |
| | | ब. एच. डी. एफ. सी. बँक लि; | ७४,८६,७६६.७१ | | | |
| | | क. येस बँक लि; | ४,१२५.०८ | | | |
| | | ड. आय.डी.बी.आय. बँक शाखा सांगली | १६,८२,४८८.२६ | | | |
| | | २. सेव्हिंग खाती | – | | | |
| – | | **३. अल्पसुचना कॉल डिपॉझीट** | – | | – | |
| ३५,०९,६२,७९४.५० | | **४. गुंतवणूक** | – | | ४१,१३,४८,७८७.०० | |
| | | अ. केंद्र व राज्य सरकारी रोखे | २९,५३,७१,३०४.०० | | | |
| | | दर्शनी किंमत २९,७५,००,०००.०० | | | | |
| | | बाजार भाव २९,०६,८६,६८७.५० | | | | |
| | | ब. शेअर्स १) एम.एस.सी. बँक | १,०००.०० | | | |
| | | २) जि.म.स. बँक | २०,०००.०० | | | |
| | | क. मुदत ठेवी १) बँक ऑफ महाराष्ट्र (राखीव निधी) | ३१,५०,०००.०० | | | |
| | | २) बँक ऑफ बरोडा (राखीव निधी) | १,४५,००,०००.०० | | | |
| | | ३) जि.म.स.बँक लि; (राखीव निधी) | ४८,००,०००.०० | | | |
| | | ४) स्टेट बँक ऑफ इंडिया (राखीव निधी) | १,३५,००,०००.०० | | | |
| | | ५) बँक ऑफ इंडिया (राखीव निधी) | २,०४,९९,५९७.०० | | | |
| | | ६) जि.म.स.बँक लि; (सर्वसाधारण गुंतवणूक) | २,२५,००,०००.०० | | | |
| | | ७) बँक ऑफ इंडिया (सर्वसाधारण गुंतवणूक) | १,००,००,०००.०० | | | |
| | | ८) जि.म.स. बँक लि; (अमृत महोत्सव निधी) | ४८,५५,०००.०० | | | |
| | | ९) स्टेट बँक ऑफ इंडिया (सर्वसाधारण गुंतवणूक) | ५१,५१,८८६.०० | | | |
| | | १०) आय.डी.बी.आय.बँक (सर्वसाधारण गुंतवणूक) | १,००,००,०००.०० | | | |
| | | ११) एच.डी.एफ.सी बँक लि. (सर्वसाधारण गुंतवणूक) | ५०,००,०००.०० | | | |
| | | १२) आय.सी.आय.सी.आय. बँक लि; जत | २०,००,०००.०० | | | |
| ४०,४७,३०,८२९.५८ | | **बेरीज पुढील पानावर** | | | ४७,४५,११,००५.७३ | |

## शेड्युल ३ (बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ कलम २९) फॉर्म 'अ'

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | भांडवल व देणी | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १०५,७४,२५,९८२.५७ | | मागील पानावरुन बेरीज | – | | १२४,९७,७१,१०४.८४ | |
| – | | ६. वसुलिचे बिले नावे बाजुप्रमाणे | – | | – | |
| – | | ७. शाखा मेळ खाते | – | | – | |
| १,४९,४७,७३७.०० | | ८. थकव्याज तरतुद | – | | १,०२,६८,९३०.०० | |
| ५,८५,४२५.०० | | ९. देणे असलेले व्याज | – | | ४,९६,९५६.०० | |
| ४४,७३,३९६.५४ | | १०. इतर देणी | – | | ५३,६५,८८१.५२ | |
| | | अ. न नेलेला लाभांश | ५०,०४३.०० | | | |
| | | ब. अनामत देणे | ३,५२,३१०.८० | | | |
| | | क. ऑडीट फी देणे | ७,७७,७१७.०० | | | |
| | | ड. टी.डी.एस. देणे | ३,७१,४६१.०० | | | |
| | | इ. स्टाफ प्रॉव्हीडंट फंड | – | | | |
| | | फ. जीएसटी देणे | ८९,५८६.७२ | | | |
| | | ग. पगारी रजा तरतुद | ३२,१५,५७६.०० | | | |
| | | म. ग्रॅच्युइटी देणे | ५,००,०००.०० | | | |
| | | भ. स्टाफ विमा देणे | ९,१८७.०० | | | |
| १,०७,९९,५०३.४० | | ११. नफा-तोटा खाते | – | | १,३५,३३,३६३.२२ | |
| | | मागील वर्षाचा शिल्लक नफा | – | | | |
| | | अधिक चालु वर्षाचा नफा | १,३५,३३,३६३.२२ | | | |
| | | बँकेने दिलेल्या हमीपत्राप्रमाणे स्वीकारलेल्या तारणी जबाबदाऱ्या रु. २०,००,०००.०० | | | | |
| | | मागील वर्षाचे रु. २०,००,०००.०० | | | | |
| | | १० वर्षावर व्यवहार नसलेली खाती | | | | |
| | | RBI_DEAF कडे वर्ग रु. ४९,८७,२६१.८८ | | | | |
| १०८,८२,३२,०४४.५१ | | बेरीज पुढील पानावर | | | १२७,९४,३६,२३५.५८ | |

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

**दिनांक : ३१/०३/२०२६ अखेरचा एकत्रित ताळेबंद**

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | मालमत्ता व येणी | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| ४०,४७,३०,८२९.५८ | | मागील पानावरुन बेरीज | – | | ४७,४५,११,००५.७३ | |
| – | | ५. प्रधान/पूरक राज्य भागीदारी निधीची गुतंवणूक | – | | – | |
| ६५,८१,८४,९१४.४८ | | ६. कर्जे | – | | ७८,१३,६४,८००.२३ | |
| | | अ) अल्प मुदतीची कर्जे व कॅशक्रेडीट | १६,६५,४५,३०३.२३ | | | |
| | | वरील कर्जापैकी | | | | |
| | | अ. सरकारी व इतर मान्य तारणावर --- | | | | |
| | | ब. इतर तारणावर १६,६५,२९,४६५.२३ | | | | |
| | | क. वैयक्तिक तारणावर १५,८३८.०० | | | | |
| | | वरील कर्जापैकी | | | | |
| | | व्यक्तिशः सभासदाकडून १६,६५,४५,३०३.२३ | | | | |
| | | थकीत २६,९४३.०० | | | | |
| | | संशयित व बुडित कर्जे (NPA) १५,८३८.०० | | | | |
| | | ब) मध्यम मुदतीची कर्जे | ८,६७,९३,६४०.०० | | | |
| | | वरील कर्जापैकी | | | | |
| | | अ. सरकारी व इतर मान्य तारणावर --- | | | | |
| | | ब. इतर तारणावर ८,६३,०२,०४०.०० | | | | |
| | | क. वैयक्तिक तारणावर ४,९१,६००.०० | | | | |
| | | वरील कर्जापैकी | | | | |
| | | व्यक्तिशः सभासदाकडून ८,६७,९३,६४०.०० | | | | |
| | | थकीत ४३,९६३.०० | | | | |
| | | संशयित व बुडित कर्जे ९६,५६१.०० | | | | |
| | | क) दिर्घ मुदतीची कर्जे | ५२,८०,२५,८५७.०० | | | |
| | | वरील कर्जापैकी | | | | |
| | | अ. सरकारी व इतर मान्य तारणावर --- | | | | |
| | | ब. इतर तारणावर ५२,५२,६६,७६८.०० | | | | |
| | | क. वैयक्तिक तारणावर २७,५९,०८९.०० | | | | |
| | | वरील कर्जापैकी | | | | |
| | | व्यक्तिशः सभासदाकडून ५२,८०,२५,८५७.०० | | | | |
| | | थकीत १,६३,९४,००८.०० | | | | |
| | | संशयित व बुडित कर्जे १,८५,०२,३४७.०० | | | | |
| १०६,२९,१५,७४४.०६ | | बेरीज पुढील पानावर | | | १२५,५८,७५,८०५.९६ | |

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

## शेड्युल ३ (बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ कलम २९) फॉर्म 'अ'

| दि. ३१/३/२०२५ रु. | भांडवल व देणी | रु. पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १०८,८२,३२,०४४.५१ | मागील पानावरुन बेरीज | - | १२७,९४,३६,२३५.५८ |
| १०८,८२,३२,०४४.५१ | एकूण बेरीज | | १२७,९४,३६,२३५.५८ |

आजच्या दिनांकाच्या अहवालास पात्र राहून बरोबर आहे.

**श्री. बा. ना. हुंचाळकर**
चेअरमन

**श्री. रा. चं. पट्टणशेट्टी**
व्हा. चेअरमन

**मे. किशोर आर. जोशी ॲण्ड असोसिएट्स**
चार्टट अकौंटंट, सांगली

**श्री. ज. सि. हिरेमठ**
मुख्य कार्यकारी अधिकारी

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

## दिनांक : ३१/०३/२०२६ अखेरचा एकत्रित ताळेबंद

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | मालमत्ता व येणी | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १०६,२९,१५,७४४.०६ | | मागील पानावरुन बेरीज | – | | १२५,५८,७५,८०५.९६ | |
| १,६८,७५,४२४.०० | | ७. येणे व्याज (पैकी एन.पी.ए. खात्यावरील रु. ८०,८६,८९४) | – | | १,२२,५०,१०३.०० | |
| – | | ८. येणे असलेली बिले जमा बाजुप्रमाणे | – | | – | |
| – | | ९. शाखा मेळ खाते | – | | – | |
| ४६,८४,२०७.०० | | १०. जागा व इमारत (घसारा वजा जाता) | – | | ४५,६७,५५२.०० | |
| | | अ) जागा | १८,०००.०० | | | |
| | | ब) इमारत | ४५,४९,५५२.०० | | | |
| १६,४०,१२७.०० | | ११. फर्निचर फिक्चर्स, लायब्ररी बुक्स, संगणक संच | – | | ४१,८९,७०८.०० | |
| २१,१६,५४२.४५ | | १२. इतर मालमत्ता व येणी | – | | २५,५३,०६६.६२ | |
| | | १) चांदीची नाणी | ५.०० | | | |
| | | २) टेलीफोन डिपॉझीट | ५,८७९.०० | | | |
| | | ३) एम.एस.ई.बी. डिपॉझीट | २३,८००.०० | | | |
| | | ४) शिल्लक स्टेशनरी | ६,१३,१९३.०० | | | |
| | | ५) प्रिपेड इन्शुरन्स | ८७,७०८.०० | | | |
| | | ६) ॲडव्हान्स इनकम टॅक्स आणि टी.डी.एस. सन २०१९-२० | ६,९२,२४५.०० | | | |
| | | ७) जीएसटी ॲडव्हान्स | ११,३०,२३६.६२ | | | |
| | | १३. नॉन बँकींग मालमत्ता | | | | |
| | | बँकेने दिलेल्या हमीपत्राप्रमाणे स्विकारलेल्या तारणी जबाबदाऱ्या रु. २०,००,०००.०० | | | | |
| | | मागील वर्षाचे रु. २०,००,०००.०० | | | | |
| | | १० वर्षावर व्यवहार नसलेली खाती | | | | |
| | | RBI_DEAF कडे वर्ग रु. ४९,८७,२६१.८८ | | | | |
| १०८,८२,३२,०४४.५१ | | एकूण बेरीज | | | १२७,९४,३६,२३५.५८ | |

### संचालक

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. धा. आ. ऐनापुरे | श्री. अ. वि. काळगी | श्री. गु. धा. मोदी | डॉ.श्री. म. शि. मोदी |
| श्री. शि. च. संख | श्री. गु. मु. हत्ती | श्रीमती वि. अ. बिज्जरगी | सौ. सु. वि. पाटील |
| श्री. पा. धों. कटरे | श्री. प्र. श्री. साळे | श्री. गु. शं. अरळी | ॲड. अ. आ. निटवे |

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

## शेड्युल ३ (बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ कलम २९) फॉर्म 'ब'

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | खर्च | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| ५,२६,१३,०१७.२० | | १. ठेवीवरील दिलेले व्याज | | - | ६,२७,४१,०२२.०० | |
| ७४,५५,०७७.०० | | २. पगार, भत्ते व प्रा. फंड कॉंट्री. | | | ९५,०५,०४९.०० | |
| ५,४१,५००.०० | | ३. संचालक भत्ता | | | ५,५३,५००.०० | |
| ८५,२१,८२८.३२ | | ४. भाडे, कर, विमा, दिवाबत्ती इ. | | | ९६,९६,९०९.६२ | |
| ५,७५०.०० | | ५. कायद्याबाबतचा खर्च | | | २०,८००.०० | |
| २,३९,५९४.०० | | ६. टपाल, तार व दूरध्वनी | | | २,५३,३३४.०० | |
| ५,००,०००.०० | | ७. ऑडीट फी | | | ६,००,०००.०० | |
| ८,८७,३०८.०० | | ८. घसारा व दुरुस्ती | | | १९,२५,२२७.५४ | |
| १,७०,०५२.८२ | | ९. स्टेशनरी, छपाई व जाहिरात | | | २,५७,७५२.५० | |
| | | १०. नॉन बँकींग व्यवहारातील नुकसान | | | | |
| ३,६१,६१०.०० | | ११. रिबेट दिले | | | १,५८,६६४.०० | |
| १९,०२,३८४.६० | | १२. इतर खर्च | | | १५,५५,०३९.५५ | |
| ३४,८६,७६२.०० | | १३. तरतूदी | | | ५९,१८,६०१.०० | |
| | | १) स्टँडर्ड असेटवरील तरतूद | १३,००,०००.०० | | | |
| | | २) सरकारी रोखेवरील प्रीमियम तरतूद | १,३७,५४४.०० | | | |
| | | ३) रजेचा पगार तरतुद | ९,१५,०५७.०० | | | |
| | | ४) बुडित कर्ज निधी तरतूद | ३०,००,०००.०० | | | |
| | | ५) गुंतवणूक घसारा तरतूद | -- | | | |
| | | ६) निवडणुक खर्च तरतूद | ६६,०००.०० | | | |
| | | ७) ग्रॅच्युइटी | ५,००,०००.०० | | | |
| १,३१,०८,९७१.३९ | | १४. निव्वळ नफा | | | १,३५,३३,३६३.२२ | |
| ८,९७,९३,८५५.३३ | | एकूण बेरीज | | | १०,६७,१९,२६२.४६ | |

आजच्या दिनांकाच्या अहवालास पात्र राहून बरोबर आहे.

**श्री. बा. ना. हुंचाळकर**
चेअरमन

**श्री. रा. चं. पट्टणशेट्टी**
व्हा. चेअरमन

**मे. किशोर आर. जोशी ॲण्ड असोसिएट्स**
चार्टट अकौंटंट, सांगली

**श्री. ज. सि. हिरेमठ**
मुख्य कार्यकारी अधिकारी

# जत अर्बन को-ऑप. बँक लि; जत

## दि. : १/४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| दि. ३१/३/२०२५ रु. | पैसे | उत्पन्न | रु. | पैसे | दि. ३१/३/२०२६ रु. | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| ८,८८,१०,८८२ | ३४ | १. मिळालेले व्याज | – | | १०,५३,०१,०३२ | ०० |
| | | १) कर्जावरील व्याज | ८,२४,२१,७५३ | २१ | | |
| | | २) गुंतवणूकीवरील व्याज | ८८,८०,७३५ | ०० | | |
| | | ३) सरकारी रोखे गुंतवणूकीवरील व्याज | १,३९,९८,५४३ | ७९ | | |
| १,८९,६२४ | ५० | २. मिळालेले कमीशन | | | १,७८,३७० | ९८ |
| – | | ३. सबसिडी व देणगी | | | – | |
| १,३९,९२४ | ०० | ४. नॉन बँकिंग व्यवहारातून झालेली मिळकत | | | – | |
| ६,०३,९३० | ४९ | ५. इतर जमा | | | १२,३९,८५९ | ४५ |
| | | १) किरकोळ जमा | ४,०२,८११ | २८ | | |
| | | २) लाभांश | २,५०० | ०० | | |
| | | ३) लॉकर भाडे | २,४५,६७८ | १७ | | |
| | | ४) सिबील चार्जेस जमा | ९१,०७० | ०० | | |
| | | ५) वसुली चार्जेस जमा | ११,५५० | ०० | | |
| | | ६) सरकारी रोखे व्यवहारातील नफा | ४,८६,२५० | ०० | | |
| ४९,४९४ | ०० | ६. ॲडव्हान्स इन्कम टॅक्स वरील व्याज | | | – | |
| ८,९७,९३,८५५ | ३३ | एकूण बेरीज | | | १०,६७,१९,२६२ | ४३ |

### संचालक

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. धा. आ. ऐनापुरे | श्री. अ. वि. काळगी | श्री. गु. धा. मोदी | डॉ.श्री. म. शि. मोदी |
| श्री. शि. च. संख | श्री. गु. मु. हत्ती | श्रीमती वि. अ. बिज्जरगी | सौ. सु. वि. पाटील |
| श्री. पा. धों. कटरे | श्री. प्र. श्री. साळे | श्री. गु. शं. अरळी | ॲड. अ. आ. निटवे |

# वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

**(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० कलम ८१ आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ (३) अन्वये सुचित केलेला नमुना क्र. एन-१ अनुसरुन)**

प्रति,

**सन्माननीय सभासद**

**जत अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जत.**

मंगळवार पेठ, जत. जि. सांगली

**संदर्भ :- वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती संबंधी वार्षिक सर्व साधारण सभा दि. ३१/०८/२०२५, ठराव क्र. ६**

## वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

१. आम्ही **जत अर्बन को-ऑप बँक लि., जत** या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१/३/२०२६ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकाचे, सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरीक्षण केले आहे. आर्थिक वर्ष १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या कालावधीच्या आर्थिक पत्रकामध्ये आम्ही लेखापरीक्षण केलेल्या चार शाखा व मुख्य कार्यालय यांच्या व्यवहाराचा समावेश आहे.

### आर्थिक पत्रकांची व्यवस्थापकीय जबाबदारी

२. सदरची आर्थिक पत्रके ही बँकिंग रेग्युलेशन ऍक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० मधील तरतूदींना अनुसरून बनविण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. सदरच्या जबाबदारी मध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, नियंत्रण आराखडा व रचना तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदी बाबींचा समावेश होतो की ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही कोणत्याही प्रकारच्या गंभीर चुका अथवा दोष विरहीत होतील.

### वैधानिक लेखापरीक्षकांची जबाबदारी

